विदर्भातील बुरुड व बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांना बांबूचा पुरवठा निस्तार दरावर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: आबांपु-1095/प्र.क्र.128/फ-9,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 30 मे, 1997.

पहा :- 1) मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) म.रा. नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-16/आर-3/बुरुडबा/4632/96-97, दिनांक 12 जुलै, 1996.

2) मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) म.रा. नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष 16/आर-3/बांबू/1408/96-97, दिनांक 20.12.1996.

3) प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचे पत्र क्र.कॅम्प मुंबई/1/96-97, दिनांक 10.1.1997.

शासन निर्णय :- विदर्भात राज्या नोंदणीकृत बुरुडांची संख्या सुमारे 8,800 आहे. बुरुड/बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांना/बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यासंबंधीच्या प्रशिक्षण संस्थांना बांबू नियमितपणे उपलब्ध होत नसल्याने बांबू पुरवठा करण्याची मागणी त्यांनी वारंवार शासनास केलेली आहे. त्यांची मागणी लक्षात घेता दरवर्षी सुमारे 25 हजार मेट्रिक टन जादा बांबू निस्तार दराने पुरवठा करण्यास शासन मंजुरी देत आहे.

2. नोंदणीकृत बुरुड व बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांना स्वयंरोजगार मिळण्याकरिता विदर्भातील नऊ जिल्ह्यात दरवर्षी प्रति कुटुंब 1,500 बांबूंचा पुरवठा निस्तार दरावर केला जाईल. ज्या बुरुडांनी/बांबू व्यवसाय करणाऱ्यांनी त्यांच्या नोंदणी केलेल्या नसतील त्यांनी खालील पध्दतीप्रमाणे नोंदणी करावी.

बिगर नोंदणीकृत बुरुड/बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांच्या नोंदणीसाठी वन परिक्षेत्रस्तरावर एक तारीख निश्चित करण्यात यावी. नोंदणी अर्ज साध्या कागदावर संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांचेकडे करण्यात यावेत. त्या अर्जामध्ये मागणी करणाऱ्या व्यक्तीचे संपूर्ण नाव, पत्ता बुरुड/बांबू व्यवसाय करणारे आहेत आणि किती बांबूंची आवश्यकता आहे याबाबतची माहिती तसेच अर्जासोबत खाली नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

(अ) सदर नोंदणी अर्ज संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांचेकडे भरून द्यावा. अर्जासोबत बुरुड असल्यास जातीचे नियमाप्रमाणे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-1493/प्र.क्र.210/मावक-5, दिनांक 9.11.1995 व शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.सीबीसी-1077/50876/कायधान-5, दिनांक 21 मार्च, 1979 नुसार घेण्यात यावे.

(ब) बांबू व्यवसाय करणारे असल्यास त्यांनी ते बांबूपासून विविध वस्तू तयार करीत आहेत याबाबत संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच/नगरपालिकेचे मुख्य अधिकारी तहसिलदार यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

(क) नोंदणी अर्ज वरीलप्रमाणे भरून आवश्यक प्रमाणपत्र जोडून ते अर्ज वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यावर, वनपरिक्षेत्र अधिकारी ते अर्ज संबंधित उपवनसंरक्षक यांचेकडे पाठवतील. उपवनसंरक्षक यांना त्यांची खात्री पटल्यास ते संबंधितांना बांबू देण्यासंबंधी वनपरिक्षेत्र अधिकारी यांना सूचना देतील.

3. निस्तार दरावर बांबू मंडप उभारण्यासाठी किंवा शेतीच्या उपयोगासाठी किंवा इतर कामासाठी, जेथे सरळ बांबूचा वापर केला जातो किंवा बांबू व्यापारासाठी बांबूचा उपयोग करणाऱ्या कामगारांना बांबूचा पुरवठा करण्यात येणार नाही.

रोटा/एच-491(1,500-6-97) (कृ.मा.प.)

4. बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यासंबंधीच्या प्रशिक्षण संस्थांनी त्यांच्या गरजेनुसार संबंधित उपवनसंरक्षकाकडे सविस्तर अर्ज, (प्रशिक्षणार्थी किती, कोणकोणत्या वस्तू तयार करतात, प्रशिक्षणाचा कालावधी इत्यादी माहिती) केल्यानंतर त्यांची खात्री पटल्यास, अशा प्रशिक्षण संस्थांनाही निस्तार दरावर बांबूचा पुरवठा करण्यात यावा.

5. विदर्भातील सध्या अस्तित्वात असलेल्या वन आगारातून आवश्यकतेनुसार बांबूचा पुरवठा वन विभागामार्फत करण्यात यावा. नवीन डेपो उघडण्याची आवश्यकता भासल्यास, त्याबाबत स्वयंस्पष्ट प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) यांचेमार्फत शासनास सादर करण्यात यावा.

6. बुरुडांनी किंवा बांबू व्यवसाय करणाऱ्यांनी सहकारी संस्था स्थापन केल्यास, मुख्यवनसंरक्षक (उत्पादन) हे त्यांच्या स्तरावर त्यांना बांबूचे वाटप कशा प्रकारे करण्यात येईल याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करतील.

7. बांबूचा गैरवापर होणार नाही यास आळा घालण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) यांनी त्यांच्या स्तरावर नियमानुसार आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

8. निस्तार दरावर बांबू देण्याचे दर निश्चित करण्यासंबंधी मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) यांनी संबंधित वनसंरक्षकांना सूचना द्याव्यात.

9. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र.336/97/व्यय-10, दिनांक 30.5.1997 ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

उ.मु.टेंभरे,
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रतिलिपि :-

सर्व वनसंरक्षक/उपवनसंरक्षक/वनपरिक्षेत्र अधिकारी,
महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-1, मुंबई,
महालेखाकार (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-1, मुंबई,
महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-2, नागपूर,
महालेखाकार (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-2, नागपूर,
वित्त विभाग/व्यय-10, मंत्रालय, मुंबई 400 032,
ब-1 कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई,
फ-9 कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई (निवड नस्ती).

--------